**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## पी.एचडी. कोर्स वर्क परीक्षा ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालयांनी संचालित करण्याबाबत विद्यापीठाच्या सूचना

अमरावती :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी सर्व संलग्नित महाविद्यालयांना नुकतेच पत्र पाठवून पी.एचडी. कोर्स वर्क ऑनलाईन परीक्षा २०२० संचालित करण्याबाबत व त्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठ पाठविलेल्या सूचनेमध्ये पी.एचडी. कोर्स वर्क ऑनलाईन परीक्षा २०२० चे प्रवेशपत्र सॉफ्टकॉपी द्वारे महाविद्यालयांच्या ईमेलवर संशोधन केंद्रांना २० एप्रिलला प्राप्त होणार आहे. सदर प्रवेशपत्र संशोधन केंद्रांना प्राप्त झाल्यानंतर त्यांचेमार्फत ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने संशोधनकर्त्याला हस्तांतरित करावयाचे आहेत. सदर प्रवेशपत्रामध्ये ऑनलाईन परीक्षेसंदर्भात असलेली लिंक, युझर नेम, पासवर्ड दिलेला असून पत्रात दिलेल्या सूचनेप्रमाणे लॉगिन करावयाचे आहे.

पासवर्ड बदलणे, लॉगिन करणे, मॉक टेस्ट, परीक्षा सुरु करणे याशिवाय मुख्य परीक्षा ही दि. २ मे, २०२१ रोजी घेण्यात येणार असून त्यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी दु. १२ ते १ आणि उर्वरित सर्व विद्याशाखांसाठी दु. ३ ते ४ या वेळात परीक्षा होणार आहे. तसेच इतर अनुषंगिक सूचना महाविद्यालयांना पाठविलेल्या पत्रात नमूद केलेल्या आहेत. प्रवेशपत्रासंबंधी अडचण असल्यास हेल्पलाईन नं. ९०११०९०४४७ अथवा ८८३०१३७३३०, तर मॉक टेस्ट व ऑनलाईन परीक्षेमध्ये अडचण असल्यास विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी ९७६६३६३९९३ व उर्वरित सर्व विद्याशाखांसाठी ९४२१०२७५८३ अथवा ८३२९४६३३३४ हा हेल्पलाईन क्रमांक दिला असून त्यावर सर्व संबंधितांनी संपर्क करावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १९/०४/२०२१.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी